# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८.०६.२०२२**

**जिल्हा : सांगली**

| मागील आठवड्यातील हवामान (२२.०६.२०२२ ते २८.०६.२०२२) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२९.०६.२०२२ ते ०३.०७.२०२२) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | दिनांक | २९ | ३० | ०१ | ०२ | ०३ |
| ०.० | ३.० | ०.० | ०.० | १.० | ०.६ | - | पाऊस (मिमी) | ५.० | ४१.० | ५९.० | २६.० | २५.० |
| २८.२ | ३१.३ | ३१.१ | ३१.२ | २९.४ | २६.९ | - | कमाल तापमान (अं.से.) | ३४.० | ३४.० | ३२.० | ३१.० | ३४.० |
| २२.६ | २२.२ | २२.८ | २२.६ | २२.५ | २२.२ | - | किमान तापमान (अं.से.) | २१.० | २२.० | २१.० | २१.० | २२.० |
| ७ | ७ | ५ | ८ | ८ | ८ | - | ढग स्थिती (आकाश) | ८ | ८ | ८ | ८ | ८ |
| ८२ | ८९ | ९० | ८७ | ८९ | ९० | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८० | ७९ | ८४ | ८३ | ८३ |
| ७५ | ८७ | ८७ | ७९ | ८३ | ८० | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५३ | ५४ | ७२ | ७० | ६६ |
| २ | ४ | २ | २ | ७ | ७ | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | २५ | २४ | २४ | २५ | २६ |
| २५ | २५ | २५ | २५ | २५ | २५ | - | वाऱ्याची दिशा | प.नै. | प.नै. | प.नै. | प.नै. | प.नै. |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सांगली जिल्ह्यात दिनांक २९ जून ते ३ जुलै दरम्यान आकाश ढगाळ राहण्याची तर दिनांक २९ जून ते ३ जुलै दरम्यान काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. कमाल तापमान ३१.० ते ३४.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान २१.० ते २२.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ७९ ते ८४% तर दुपारची सापेक्ष आद्रता ५३ ते ७२% दरम्यान रहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी २४ ते २६ कि.मी. दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २९ जून ते ५ जुलै दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी दरम्यान तसेच कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी व किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबाईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून अँड्रॉइड अॅप्लिकेशन "मेघदूत " तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इअँड्रॉइड "दामिनी" ठीच्या अंदाजासा. अॅप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>➢ शिराळा तालुक्यातील शेतकरी बंधूनी वाफसा आल्यावर पेरणी करावी तर उर्वरित सर्व तालुक्यातील शेतकरी बंधूनी ७० ते १०० मिमी पाऊस झाल्यासच पेरणी करावी.<br>➢ जिल्ह्याच्या पूर्व भागात पावसाची उघडीप असताना व वाऱ्याचा वेग कमी असतानाच फवारणी करावी. |
| संदेश | | ➢ जनावरांना लाळखुरकत, फऱ्या व घटसर्प या रोगांच्या एकत्रित रोगप्रतिबंधक लसी टोचून घ्याव्यात. |
| भुईमुग | पेरणीपूर्व तयारी | ➢ खरीप हंगामध्ये भुईमुग पेरणीसाठी पुढील वाणांची निवड करावी<br>एस.बी.-११,जे.एल.-२४(फुले प्रगती) टी. अे.जि.-२४, जे.एल.-५०१, फुले उन्नती, फुले मोरणा, फुले वारणा<br>➢ आंतरपिके: खरीप भुईमुग पिकात सोयाबीन, सुर्यफुल, मूग व उडीद ही आंतरपिके ६:२ या प्रमाणात तसेच भुईमुग+ज्वारी १:१ या प्रमाणात घेता येतात. भुईमुग पिकामध्ये सोयाबीन हे आंतरपीक ४:१ या प्रमाणात घेतल्यास व कडेने एरंडाची लागवड केल्यास (दोन ओळी) पाने खाणाऱ्या अळीचे नियंत्रण होण्यास मदत होते.<br>➢ **बीजप्रक्रिया :** बियाण्यापासून प्रादुर्भाव होणाऱ्या व रोपावस्थेत येणाऱ्या रोगांपासून संरक्षणासाठी पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक चोळावे नंतर २५ ग्रॅम रायझोबिम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळविणारे जीवाणू संवर्धक चोळून बीजप्रक्रिया केलेले बियाणे सावलीत सुकवून पेरावे. |
| सोयाबीन | पेरणीपूर्व तयारी | ➢ पेरणीसाठी खालील वाणांची उपलब्धता करून घ्यावी.<br>➢ फुले किमया (केडिएस ७५३), फुले संगम (केडिएस ७२६), फुले अग्रणी (केडिएस ३४४), फुले कल्याणी (डिएस २२८), जे.एस.-३३५<br>➢ सलग पेरणीसाठी ७५ ते ८० किलो प्रती हेक्टर तर टोकन करण्यासाठी ४५ ते ५० किलो प्रती हेक्टर बियाणे लागते.<br>➢ बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण करण्यासाठी प्रती किलो बियाण्यास ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा भुकटी चोळावी. बुरशीनाशकाची बीजप्रक्रिया केल्यानंतर थायमिथोक्झाम ३४% एस.एफ. (१० मिली प्रती किलो बियाण्यास) बीजप्रक्रिया करावी त्यामुळे |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| | | खोड माशीपासून रोपांवस्थेत पिकाचे संरक्षण होते.<br>➢ आंतरपिके : सोयाबीन + तूर (३ : १) या प्रमाणात घ्यावे.<br>➢ सोयाबीन पिकास हेक्टरी ५० किलो नत्र, ७५ किलो स्फुरद व ४५ किलो पालाश पेरणीच्या वेळी द्यावे. खते पेरणीपूर्वी जमिनीत मिसळून द्यावीत अथवा दोन चाड्याच्या पाभरीने खते व बियाणे एकाच वेळी पेरून द्यावे. |
| **ऊस** | वाढीची अवस्था | ➢ हुमणी किडीच्या नियंत्रणासाठी प्रकाश सापळ्यांचा वापर करावा.<br>➢ ऊस पिकामध्ये तणनियंत्रण करावे. |
| **मूग** | पेरणीपूर्व तयारी | ➢ पेरणीसाठी वैभव, ए.के.एम.-४, बि.एम.२००३-२, बि.एम.२००२-१ आणि उत्कर्षा या मूग वाणांची निवड करावी.<br>➢ बियाण्याचे प्रमाण: १५ ते २० किलो प्रती हेक्टर. |
| **डाळिंब** | आंबिया बहार | ➢ आंबिया बहार: छिद्र पडून खराब झालेली फळे गोळा करावीत व बागेपासून दूर अंतरावर खड्डा खणून त्यामध्ये हि फळे पुरून नष्ट करावीत. तसेच सायंट्रानीलीप्रोल १०.२६% ओ.डी. @०.७५ मिली प्रती लिटर पाणी + ०.२५ मिली स्टीकर याप्रमाणात मिसळून पावसाची उघडीप असताना फवारणी करावी. |
| **जनावरे** | वाढीची | ➢ जनावरांना लाळखुरकत, फऱ्या व घटसर्प या रोगांच्या एकत्रित रोगप्रतिबंधक लसी टोचून घ्याव्यात.<br>➢ पावसाळ्यात जनावरांच्या पिण्याच्या टाक्यांमध्ये पावसाचे वाहत आलेले पाणी जाणार नाही याची दक्षता घ्यावी. पाण्याच्या हौदांची नियमित स्वच्छता करून चुना लाऊन घ्यावे. |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर
दि. :२८.०६.२०२२

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**